अपिल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका
जावक.क्र. 2098
दिनांक. 8/12/17

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

**अपिलार्थी**

श्री. जितेंद्र अशोक भोसले
ऑफिस – स.नं २३०, बंगला नं ३,
गंगा नेबुला सोसायटीजवळ,
विमाननगर, पुणे १४

**विरूध्द**

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका

## विवेचन

अर्जदार श्री. जितेंद्र अशोक भोसले रा. ऑफिस – स.नं २३०, बंगला नं ३, गंगा नेबुला सोसायटीजवळ, विमाननगर, पुणे १४ यांनी आ.क्र. २५९५, २५९६, २५९७, २५९८, २६००, २६०१, २६०२, २६०३, २६०४, २६०५, २६०६, २६०७, २६०८, २६०९, २६१२, २६१०, २६११, २६१३, २६१४, २६१५, २६१५, २६१६, २६१७, २६१८, २६१९, २०२०, २६७७, २६२६, २६२३, २६२४ दि. १०.११.२०१७ व आ.क्र.२६६०, २६५९, २६६१, २६६२, २६६३, २६५८ दि. १५.११.२०१७ व आ.क्र. २८२० दि. २४.११.२०१७ रोजी अपिल केलेले आहे. त्या सर्व अपिलाची सुनावणी दि. ६.१२.२०१७ रोजी स.११.०० वा. ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री जितेंद्र अशोक भोसले, जनमाहिती अधिकारी प्र. उप अभियंता श्री सागर शिंदे , सहा. जनमाहिती अधिकारी श्रीमती अरूणा चौरे हे उपस्थित होते. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री सुरेश साखळे हे अन्य शासकीय कामांसाठी बाहेर गेले असल्याने अनुपस्थित राहिलेले आहे.

अपिलार्थी यांनी सर्व प्रथम माहिती अधिकारांतर्गत दि. १३.९.२०१७ रोजीचे एकूण २१ अर्ज व दि. ३.१०.२०१७ रोजीचा एक अर्ज असे एकूण २२ अर्ज व दि. २२.९.२०१७ रोजीचे एकूण १६ अर्ज दाखल केले होते. त्या अर्जास जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी त्याच्या कडील पत्र जा.क्र. माअ/१ दि. ३.१०.२०१७ रोजी व पत्र जा.क्र. ११६० दि. २७.९.२०१७ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये समक्ष आल्यास मीटर विभागाकडील संगणक विभागामध्ये सर्व्हे नं , जागामालक, नळजोड दिल्याचा दिनांक, ग्राहक क्रमांक, पाणी वापराचा प्रकार, चालू पाणी पट्टी, थकबाकी, रेकॉर्ड उपलब्ध आहे. त्यामधील त्यांना हवी असणारी माहिती त्यांनी दाखविल्यास प्रति पान २/–रू. प्रमाणे शुल्क आकारून देता येईल. तसेच सी डी स्वरूपामध्ये कॉपी करता येवू शकेल, असे कळविलेले आहे.

करण्यात येऊ शकेल, असे कळविलेले आहे.

यामध्ये अपिलार्थी यांना कोरेगाव पार्क, विमाननगर , वडगावशेरी, मंगलदास रोड येथील हॉस्पिटल , हॉटेल इ. बाबत व त्यांच्या पाण्याच्या वापराबाबत निवासी अथवा कमर्शिअल माहिती हवी असल्याचे दिसून येते. एकूण माहितीचे स्वरूपाची व्याप्ती पाहता जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना सी डी स्वरूपामध्येही माहिती उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविलेली आहे. दि. ६.१२.२०१७ च्या प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी पाणी पुरवठा विभागाकडे संगणक मीटर विभागाकडे त्यांच्या मुळ अर्जामधील हॉटेल , हॉस्पिटलच्या नावाचा समावेश आहे अगर नाही? अशा स्वरूपाची माहिती त्यांना हवी आहे. यापूर्वीस जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी त्याचे पत्र क्र जा.क्र. ११६० दि. २७.९.२०१७ चे अपिलार्थी यांना कळविले आहे. प्रत्यक्ष पाणी पुरवठा विभागाकडे नळजोडाकरीता लायसन्स प्लंबर मार्फत जागेचा मालक/विकसक यांच्या कडून अर्ज केला जातो. अर्जा सोबत इमारतीचे मान्य नकाशे त्यानुसार नळजोड वापराचा प्रकार मान्य केला जातो. त्यानंतर त्या मालमत्ते वरती संबंधिताकडून वेगवेगळया अनुज्ञेय वापरानुसार व्यवसाय सुरू केला जातो.

अपिलार्थी यांना ~~त्यांच्या~~ त्यांच्या मुळ अर्जामधील हॉटेल, हॉस्पिटलची नावे नमूद करून संगणकावर उल्लेख आहे/नाही इ. माहिती जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी आठ दिवसांमध्ये विना मोबदला दयावी..

सबब अपिल निकाली काढण्यात येत आहे.

गणपत साळुंके
(मो.नं. ९६८९९३१७४२ ,)
कार्यकारी अभियंता तथा अपिल अधिकारी
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

टीप :- वरील आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास द्वितीय अपिल मा. कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधानभवन समोर, पुणे १ येथे अपिलाच्या निकालापासून ९० दिवसांच्या आत अपिल करू शकतील.

प्रत :-१. श्री. सुरेश साखळे
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

२. श्री. सागर शिंदे
सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा प्र. उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

३. श्रीमती अरूणा चौरे
सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

Received copy

14/12/17 Shamimshah